# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## क्रिकेट खेळणाऱ्या ११ वर्षीय बालकाचे अपहरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे -**



क्रिकेट खेळणाऱ्या ११ वर्षीय बालकाचे अपहरण झाल्याप्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबबात सुभाष राजशेखर चिट्टे (वय ३६, रा. आशा नगर, बसवेश्वर चौक, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्रेयस प्रकाश पावले (वय ११) असे अपहरण झालेल्या मुलाचे नाव आहे. ४ मे रोजी सायंकाळी सुभाष चिट्टे यांच्या बहिणीचा मुलगा श्रेयस पावले हा आशा नगर येथील घराजवळ क्रिकेट खेळत होता. त्यावेळी त्याने इतर मित्रांना माझे मामा आले आहेत, मी दुसरीकडे क्रिकेट खेळायला जातो असे सांगून तो दुसरीकडे क्रिकेट खेळायला गेला. त्यानंतर तो खूप वेळ झाला तो घरी आलाच नाही. त्यामुळे त्याचा नातेवाईकांकडे शोध घेतला असता तो मिळून आला नाही. श्रेयस यास कशाचे तरी आमिष दाखवून कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अपहरण केले असल्याची तक्रार चिट्टे यांनी दिल्याने याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हादाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक व्ही. एस. बनसुडे पुढील तपास करीत आहेत.

### ▶▶ क्राईम वृत्त...

## मुक्तेश्वर नगरात साडेतीन लाखांची घरफोडी

**सोलापूर, दि. ६ मे-**

शहरातील जुळे सोलापूर परिसरातील मुक्तेश्वर नगरात चोरट्याने बंद घराचे कुलूप तोडून ३ लाख ४३ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले.




याबाबत पद्मावती प्रदीप चिल्ला (वय ४३, रा. मुक्तेश्वर नगर, ज्ञानेश्वर नगर बस स्टॉप समोर, जुळे सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पद्मावती चिल्ला या ५ मे रोजी सकाळी घराला कुलूप लावून बाहेर गेल्या होत्या. त्या दुपारी दोन वाजता परत घरी आल्या. त्यावेळी त्यांना घरामध्ये चोरी झाल्याचे दिसून आले. चोरट्याने चिल्ला यांच्या बंद घराचे कुलूप तोडून बेडरूममधील लाकडी दरवाजाची झडप उघडून त्यामध्ये ठेवलेले ५ तोळ्याचे सोन्याचे गंठण, दीड तोळ्याचा नोकलेस, अर्धा ग्रॅमची अंगठी असा ३ लाख ४३ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. अशी नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. सहायक पोलिस निरीक्षक गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

## हॉकी स्टीकने मारहाण करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ६ मे-**

पाणी अंगावर उडाल्याच्या कारणावरून हॉकी स्टीकने मारहाण करणाऱ्याविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत राजेश गुंडीबा बंदपट्टे (वय २१, रा. न्यु पाच्छा पेठ, भावनाऋषि हॉस्पीटलशेजारी, अशोक चौक, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन लखन मच्छिंद्र दांगडे (रा. न्यु पाच्छा पेठ, अशोक चौक, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ४ मे रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास राजेश बंदपट्टे हा घरासमोर बसून पाणी पिऊन चूळ भरत होता. चूळ भरताना थोडे पाणी गल्लीत राहणाऱ्या लखन दांगडे याच्या अंगावर उडाले. त्याचा राग मनात धरून दांगडे याने हॉकी स्टीकने बंदपट्टे यास मारहाण करून जखमी केले. अशी नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार सय्यद पुढील तपास करीत आहेत.



## प्रकाश यलगुलवारविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ६ मे-**

रिक्षावर काँग्रेस पक्षाचे बॅनर लावून विद्रुपीकरण केल्याप्रकरणी प्रकाश यलगुलवार यांच्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्या गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिस शिपाई बाळू जाधव यांच्या फिर्यादीवरुन प्रकाश यलगुलवार (निवडणुक प्रतिनिधी, सोलापूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस आयुक्त यांनी दिलेल्या आदेशानुसार ध्वनीक्षेपकाच्या वापरावर निर्बंध घालण्यात आलेले आहेत. तसेच दिवसाप्रचारासाठी फिरणाऱ्या वाहनांनी ध्वनीक्षेपकाचा वापर विशिष्ठ ठिकाणी थांबून करावा व ध्वनीक्षेपकाच्या आवाजासह फिरणाऱ्या वाहनास प्रतिबंध केला आहे. प्रकाश यलगुलवार यांनी सात रस्ता परिसरातील सुदा इडली गृहच्या बाजूस पोलिस आयुक्तांच्या आदेशाचा भंग करून रिक्षावर काँग्रेस पक्षाचे बॅनर लावून सार्वजनिक विद्रुपीकरण केले म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार देढे पुढील तपास करीत आहेत.

## चार चाकी वाहनावर बसपाचा झेंडा लावून आचारसंहितेचा भंग

**सोलापूर, दि. ६ मे-**

चारचाकी वाहनावर बहुजन समाज पार्टीचा झेंडा लावून आदर्श आचारसंहितेचा भंग करणाऱ्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिस शिपाई करण भोसले यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आप्पा आबा लोकरे (वय ५२, रा. अमृत नगर, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ५ मे रोजी सायंकाळी सात रस्ता येथे आप्पा लोकरे यांनी त्यांच्या एमएच २४ एडी ८१११ या चार चाकी वाहनाच्या बॉनेटवर बहुजन समाज पार्टीचा झेंडा लावला. म्हणून त्याच्यांविरुध्द आचारसंहितेचा भंग केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक माडे पुढील तपास करीत आहेत.

# आरोप-प्रत्यारोपाने मराठा समाजात खळबळ

## पैसे घेतल्याचा आरोप सिद्ध करा अन्यथा मानहानीचा दावा : माऊली पवार

**मी समाजकारण सोडतो; नाही तर अमोल शिंदेंनी राजकारण सोडावे**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

एका राजकीय नेत्याकडून पैसे घेतल्याचा खोटा आणि बदनाम करण्याचा आरोप शिवसेना शिंदे गटाचे नेते अमोल शिंदे यांनी माझ्यावर (माऊली पवार) केला आहे. याबद्दल त्यांनी जाहीर माफी मागावी अन्यथा आरोप सिद्ध करावा नाही तर मानहानीचा दावा ठोकणार असल्याचे सकल मराठा समाजाचे समन्वयक माऊली पवार यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

एका स्थानिक वृत्तवाहिनीच्या मुलाखतीमध्ये शिवसेना शिंदे गटाचे नेते अमोल शिंदे यांनी माऊली पवार यांनी एका राजकीय नेत्याकडून पैसे घेतल्याचा आरोप केला होता. या संदर्भात माऊली पवार म्हणाले, पैसे घेतल्याचा खोटा आणि बदनाम करण्याचा आरोप शिंदे यांनी केला आहे त्याचा निषेध करतो. चळवळीला बदनाम करायचं हा प्रयत्न आहे. त्यांनी हे आरोप सिद्ध केले तर मी समाजकारण सोडतो नाही तर शिंदे यांनी राजकारण सोडावे, असे आव्हान यावेळी माऊली पवार यांनी दिले आहेत. या पत्रकार परिषदेत राजन जाधव, अ‍ॅड. श्रीरंग काळे, मनोज मोरे, डॉ. प्रमोद पाटील आदी उपस्थित होते.

## माऊली पवार यांनी काँग्रेसच्या प्रचारासाठी २० लाख घेतल्याचे पुरावे देतो : अमोल शिंदे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**



समाजाच्या नावाखाली दलाली बंद झाली पाहिजे, असे सांगताना माझ्याकडे पुरावे आहेत. माऊली पवार यांनी खुशाल मानहानीचा दावा दाखल करावा, असे प्रति आव्हान शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी पत्रपरिषदेत दिले आहे.

सकल मराठा समाजाचे स्वयंघोषित समन्वयक म्हणून माऊली पवार मिरवतात. त्यांनी लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवार आ. प्रणिती शिंदे यांचा प्रचार करण्यासाठी काँग्रेसच्या एका माजी नगरसेवकाच्या घरी बैठक घेतली. त्यानंतर संघर्ष योद्धा मनोज जरांगे- पाटील हे सोलापुरात येण्याच्या आदल्या दिवशी मंगळवेढा रोडवर क्रिस्टा गाडीमध्ये त्यांनी वीस लाख रुपये घेतले आहेत. त्याचा पुरावा माझ्याकडे आहे. गाडी नंबरही मी देतो. त्यामुळे माऊली पवार यांनी खुशाल मानहानीचा दावा दाखल करावा. मी पुरावे सादर करतो, असे प्रति आव्हान अमोल शिंदे यांनी दिले आहे. संघर्ष योद्धा जरांगे-पाटील यांनी या लोकसभा निवडणुकीत कोणत्याही पक्षाला पाठिंबा अथवा विरोध नसल्याचे स्पष्ट केले आहे. तरीही सोलापुरात काँग्रेसच्या उमेदवाराला निवडून आणण्यासाठी माऊली पवार यांनी सुपारी घेतल्याचा आरोप यावेळी अमोल शिंदे यांनी केला. जरांगे-पाटील यांनी सोलापुरात आल्यानंतर काँग्रेसच्या आ. प्रणिती शिंदे यांच्याकडून सत्कार स्वीकारणार नसल्याचे स्पष्ट केल्याने माऊली पवार यांचा तीळ पापड झाला. मराठा समाज सूज्ञ आहे. स्वतःच्या आर्थिक लाभासाठी समाजाला विकण्याचे काम करत असतील तर समाज गप्प बसणार नाही. मराठा समाज अशा लालची लोकांच्या मागे कदापिही राहणार नाही. समाजाच्या नावे पैसे घेऊन दुकानदारी करणाऱ्याच्या पाठीशी समाजाने राहू नये, असे आवाहन अमोल शिंदे यांनी केले. या पत्रकार परिषदेस माजी नगरसेवक अनंत जाधव, श्रीकांत घाडगे, तुकाराम म्हस्के, शशी थोरात आदी उपस्थित होते.

## निवडणूक साहित्य घेण्यासाठी कर्मचाऱ्यांची तहसील कार्यालयात गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

जिल्ह्यात सोलापूर आणि माढा लोकसभेसाठी आज मतदान होणार आहे. यासाठी आवश्यक ईव्हीएम मशीन, सर्व फॉर्म, स्टेशनरी घेवून जाण्यासाठी नेमणूक केलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी तहसील कार्यालयांवर एकच गर्दी केल्याचे दिसून आले.



राज्यात ५ टप्प्यात निवडणुका होणार आहे. पहिल्या टप्प्यात १९ एप्रिलला मतदान, दुसऱ्या टप्प्यात २६ एप्रिल, आपल्या जिल्ह्यासह धाराशिव, लातूर व इतर ७ जिल्ह्यात तिसऱ्या टप्प्याचे ७ मे, चौथा टप्पा १३ मे आणि पाचवा टप्पा २० मे असे ५ टप्प्यात मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. सोलापूर जिल्ह्यात मतदानासाठी एकूण ३ हजार ६१७ मतदान केंद्रे आहेत. तसेच ३ हजार ५९९ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आहेत. तर २२ हजाराच्यावर विविध विभागाचे कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर या मशीन्सची मतदारांना प्रात्यक्षिकेही दाखविली आहेत. नेमणूक दिलेल्या कर्मचारी-अधिकाऱ्यांना निवडणुकीबाबत पूर्ण प्रशिक्षणही देण्यात आले आहे. निवडणुकीसाठी आवश्यक तो पोलिस बंदोबस्तही मिळणार आहे. सोमवारी हे सर्व कर्मचारी मतदान केंद्राच्या ठिकाणी मुक्कामी राहणार असून, दुसऱ्या दिवशी म्हणजे मंगळवार, दि. ७ रोजी सकाळी ७ वाजेपासून सायंकाळी ६ पर्यंत मतदान प्रक्रिया पार पाडणार आहेत. दरम्यान, या मतपेट्या रामवाडी गोडावूनला जाईपर्यंत या कर्मचाऱ्यांना ऑनड्यूटीच राहावे लागणार असल्याचे समजते.

## निर्भयपणे मतदान करा : जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघात ४० लाख २१ हजार ५७३ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. शहर-जिल्ह्यातील सर्व मतदारांनी या लोकशाही उत्सवात सहभाग नोंदवून कोणत्याही अमिषाला बळी न पडता निर्भयपणे आपले मतदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी केले आहे.

सोलापूर लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा मतदारसंघात १ हजार ९६८ मतदान केंद्रे उभारण्यात आली असून, या केंद्रांवर २० लाख ३० हजार ११९ तर माढा लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा मतदारसंघात २ हजार ३० केंद्रांवर १९ लाख ९१ हजार ४५४ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यासाठी प्रशासकीय व पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे. संवेदनशील मतदान केंद्रावर अतिरिक्त दोन हत्यारी पोलीस तैनात करण्यात येणार आहेत. सोलापूर लोकसभा मतदारसंघात १४ मतदान केंद्रे संवेदनशील आहेत. मतदान प्रक्रिया राबविण्यासाठी २ हजार ४५७ बॅलेट युनिट, २ हजार ४५७ कंट्रोल युनिट व २ हजार ६५२ व्हीव्हीपॅट इतक्या मशीन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. माढा लोकसभा मतदारसंघात शहरी २५२ तर ग्रामीणमध्ये १ हजार ७७८ मतदान केंद्रे आहेत. यातील १८ मतदान केंद्रे संवेदनशील आहेत. या मतदारसंघातील १ हजार २७ मतदान केंद्रांवर वेबकास्टिंग करण्यात येणार आहे.



### मतदान केंद्रावर आवश्यक सुविधा

मतदारांचा मतदानातील टक्का वाढावा यासाठी निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार मतदान केंद्रावर मंडप उभारण्यात येणार आहे. त्याठिकाणी मतदारांना बसण्यासाठी सुविधा, पिण्यासाठी थंड पाणी, ओआरएसचे पाणी आदी सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मतदारांना काही त्रास झाल्यास औषधे आणि अ‍ॅम्ब्युलन्सचीही सोय केली आहे.

### मतदानासाठी ग्राह्य असलेली ओळखपत्रे

मतदानासाठी ओळखीचा पुरावा म्हणून मतदार ओळखपत्राबरोबर इतर १२ पुरावे ग्राह्य धरले जाणार आहेत. त्यात आधार कार्ड, मनरेगा जॉब कार्ड, बँक पोस्ट ऑफिसने फोटोसह दिलेले पासबुक, कामगार मंत्रालयाच्या योजनेअंतर्गत जारी केलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पासपोर्ट, छायाचित्रासह पेन्शन दस्ताऐवज, केंद्र व राज्य सरकार लिमिटेड कंपनीने कर्मचाऱ्यांना दिलेले छायाचित्र असलेले ओळखपत्राचा समावेश आहे, अशी माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निर्हाळी यांनी दिली. मतदारांनी ओळखीचा पुरावा म्हणून मतदार माहिती चिठ्ठी ग्राह्य असणार नाही, असेही निऱ्हाळी यांनी सांगितले.

# जिल्ह्यातील ४० लाख मतदार आज निवडणार ‘भावी खासदार’

- **जिल्हा प्रशासन सज्ज**
- **टक्का वाढविण्यासाठी सर्वजण प्रयत्नशील**
- **४ जूनला मतमोजणी**

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. ६ मे-**



सोलापूर, माढा मतदारसंघात मंगळवार, दि. ७ मे रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ पर्यंत मतदान होणार असून, ४० लाख २१ हजार ५७३ मतदार आपला भावी खासदार निवडणार आहेत. दरम्यान, आपले हक्काचे मतदान कोणाला करायचे? याबाबत मतदानाच्या पूर्वसंध्येला प्रत्येकाच्या कुटुंबात, मित्र कंपनीत जोरदार चर्चा चांगल्याच रंगू लागल्या होत्या.

निवडणुकीसाठी उभारलेल्या उमेदवारांसह त्यांचे कार्यकर्ते, पदाधिकारी, नेतेगणांनीही गेल्या १०-१२ दिवसांपासून चांगलेच प्रचाराचे रान पेटविले होते. सोमवारी शेवटच्या दिवशी पदयात्रा काढून आपल्यालाच मतदान करण्याचे त्यांनी आवाहन केले आहे तर ‘गुलाल आपल्यालाच लागणार’ असा दावा सर्वच उमेदवार करताना दिसत आहेत. गेल्या पंधरवड्यात उमेदवार आणि त्यांच्या जेष्ठ नेत्यांनी सोलापूरसह माढा मतदारसंघात जाहीर सभांचा धडाका लावला होता. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, काँग्रेस नेते राहुल गांधी, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे, भाग्यनगरचे आमदार टी. राजासिंह ठाकूर, विश्वजित कदम, सतेज पाटील, रिपाइं, वंचित गटाचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर यांच्यासह इतर काही नेत्यांनी या दोन्ही मतदारसंघात जोरदार जाहीर सभा घेतल्या. या निवडणुकीत एकमेकांवर टोकाचे आरोप-प्रत्यारोपही झाले. उमेदवारांनी कॉर्नर सभा, मेळावे, घरोघरी जाऊन मतदार गाठीभेटी घेऊन विविध उपक्रमही प्रचारात राबविले. मतपेट्या सोमवारी (दि. ६) प्रत्येक बुथवर गेल्या आहेत. संवेदनशील मतदान केंद्र आणि इतर बुथवरही पोलिस यंत्रणेचा तगडा बंदोबस्तही लावण्यात आला आहे.

### सोलापूर : २१ उमेदवार रिंगणात

सोलापूर लोकसभा मतदारसंघात आ. प्रणिती शिंदे (काँग्रेस), आ. राम सातपुते (भाजप), बबलू गायकवाड (बहुजन समाज पार्टी), प्रा. डॉ. अर्जुन ओहेळ (बहुजन मुक्ती पार्टी), कुमार लोंढे (बळीराजा पार्टी), युगंधर ठोकळे (पीपल्स पार्टी ऑफ इंडिया डेमोक्रॅटिक) यांच्यासह अपक्ष उमेदवार अतिश बनसोडे, अण्णा मस्के, विजयकुमार उघडे, कृष्णा भिसे, सुदर्शन खंदारे, महासिद्ध गायकवाड, परमेश्वर गेजगे, भंते नागमूर्ती कुरणे, अ‍ॅड. विक्रम कसबे, रमेश शिखरे, विद्या दुर्गादेवी, सचिन मस्के, सुनीलकुमार शिंदे, प्रा. डॉ. सुभाष गायकवाड, शिवाजी सोनवणे हे २१ उमेदवार रिंगणात आहेत.

### माढा : ३२ उमेदवार मैदानात

माढा लोकसभा मतदारसंघात धैर्यशील मोहिते-पाटील (राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष), खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर (भाजप), स्वरूप जानकर (बसपा), सिद्धेश्वर आवारे (ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक), गोपाळ जाधव (भारतीय जवान किसान पार्टी), रमेश बारस्कर (वंचित बहुजन आघाडी), संतोष बिचुकले (रिपाइं आठवले गट), रामचंद्र घुटुकडे (न्यू राष्ट्रीय समाज पार्टी), सत्यवान ओंबासे (स्वराज्य सेना) यांच्यासह अपक्ष उमेदवार अनिल शेंडगे, अमोल करडे, अशोक वाघमोडे, काशीनाथ देवकाते, किरण साठे, संदीप खरात, गिरीश शेटे, सचिन जोरे, धनाजी मस्के, नवनाथ मदने, नानासाहेब यादव, नारायण काळेल, नंदू मोरे, बळीराम मोरे, भाऊसाहेब लिगाडे, रोहित मोरे, रशीद शेख, गणेश सरडे, राहुल सावंत, विनोद सीतापुरे, सीताराम रणदिवे, हनुमंत माने, लक्ष्मण हाके हे ३२ उमेदवार निवडणूक लढवत आहेत.



## मतदानासाठी शहर-जिल्ह्यात ८ पोलिसांचा बंदोबस्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ मे -**

जिल्ह्यातील सोलापूर आणि माढा मतदारसंघात मंगळवार ७ मे रोजी मतदार होत आहे. दोन्ही मतदारसंघात जिल्ह्यात ३ हजार ६१७ मतदान केंद्रे असून हे मतदान शांततेच्या वातावरणात पार पडावे म्हणून शहर व जिल्हा ग्रामीण पोलिस दलाच्यावतीने सुमारे ८ पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यवतमाळ, चंद्रपूर, आंध्र प्रदेश, तामीळनाडू येथील पोलिसांचा बंदोबस्ताचा सोलापूरमध्ये आला आहे.

सोलापूर शहरात ७९८ मतदान केंद्रे असून त्यासाठी शहर पोलिस आयुक्तालयाच्यावतीने सुमारे ३ हजार पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे. मतदान केंद्र परिसरात तीन स्तरावर हा बंदोबस्त तैनात करण्यात आलेला असून एखाद्या अनुचित प्रकाराची माहिती मिळाल्यापासून केवळ दोन ते तीन मिनिटात पोलिसांचा फौजफाटा घटनास्थळी पोहचेल अशा प्रकारे बंदोबस्ताची आखणी करण्यात आली आहे. सोलापूर शहरासाठी १०५० होमगार्ड, बीएसएफ-आरपीएफ-एसआरपीएफच्या ३ कंपन्या, सुमारे ५०० कर्मचारी इतर जिल्ह्यातून बंदोबस्तासाठी आलेले आहेत. निवडणुकीच्या अनुषंगाने सोलापूर शहर पोलिसांकडून १२४५ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. त्यामध्ये सीआरपीसी १०७ प्रमाणे ९९१, १०९ प्रमाणे ३५, ११० प्रमाणे १२८ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. मुंबई पोलिस कायद्यानुसार विविध कलमाखाली ८६ जणांना तडीपार करण्यात आले असून ६ जणांवर एमपीडीएअंतर्गत स्थानबध्दतेची कारवाई करण्यात आली असल्याचे पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### संकल्प संस्थेचा स्नेहमेळावा उत्साहात

**सोलापूर, दि.६ मे -**

संकल्प मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने स्नेहमेळावा महिलांचा आयोजित केला होता. यावेळी उज्वला शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. प्रमुख पाहुणे म्हणून प्रिती शिंदे, छाया वाघमारे, संजीवकुमार मुरुमकर, कल्पना गायकवाड, प्रमिला तुपलोंढे, भिमकन्या दिया सोनकांबळे यावेळी मान्यवरांच्या हस्ते मातारमाई, जिजाऊ, सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी शिंदे बोलताना ही संस्था गेले १५ वर्षे कार्यरत आहे. संस्थेतर्फे तळागाळातील महिलांना मार्केटिंग इव्हेंट च्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करुन देण्यात येते. तसेच महिलांना मोफत आरोग्य शिबीर गोरगरिब मुलांना वह्या वाटप, गणवेश वाटप, पुस्तक वाटप तसेच कोरोनाच्या काळामध्ये संकल्प मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे गोरगरिब लोकांना अन्नधान्य तसेच जे आजारी पेशंट यांना बरे करण्याचे व त्यांना हातभार लावायचा मोठा वाटा संस्थेने आहे. या कार्यक्रमास ६०० महिलांची उपस्थिती होती. त्याप्रसंगी महेश गाडेकर, डॉ. संजीवकुमार मुरुमकर व संतोष बागले यांचेही भाषण झाले. कार्यकम यशस्वी करण्यासाठी ॲड.नागसेन सोनकांबळे, विशाल गायकवाड, दिलीप निंबाळकर, नागनाथ कांबळे, दिपक बनसोडे, अमिना शेख, राजश्री नंदुरकर, मंजु कांबळे, कौशल्या बागले, माधुरी बागले, भारती बनसोडे, तक्षशिला कांबळे, विपीन चवरे, अमोल गायकवाड, शुभम चवरे यांनी परिश्रम घेतले.

### अभिनेता मनोज वाजपेयी यांचा अंगणवाड्यांच्या 'नंद घर' मोहिमेत सहभाग

**सोलापूर, दि.६ मे-**

भारतभरातील १४ लाख अंगणवाड्यांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशाने चालवण्यात येणाऱ्या नंद घरमध्ये राष्ट्रीय मोहीम सुरु करण्यात आली आहे. अगर बचपन से पूछा खाना खाया तो देश का कल बनाया. अभिनेता मनोज वाजपेयी यांचा नंद घरच्या राष्ट्रीय मोहिमेत सहभाग असणार आहे. भारताच्या भविष्यातील पिढीला दर्जेदार पोषण मिळावे, त्यांची सर्वसमावेशक आरोग्य देखभाल केली जावे व मुलांना सर्वोत्तम प्रीस्कुल शिक्षण मिळावे हा नंद घरचा उद्देश आहे.या मोहिमेमध्ये मनोज वाजपेयी यांचे स्वागत करताना, वेदांताचे चेयरमन अनिल अगरवाल यांनी सांगितले,नंद घर ही राष्ट्रीय मोहीम आरोग्य आणि पोषणावर भर देत मुले व महिलांचे एकंदरीत कल्याण साधले जावे यासाठी साहाय्य करते. आज या मोहिमेची सुरुवात करण्यात आली, त्यावेळी मनोज वाजपेयी यांनी युवा थिएटर अभिनेत्यापासून आजपर्यंतचा प्रवास वर्णन केला, अभिनयाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असताना नियमितपणे पोषक आहार मिळावा यासाठी मित्रांकडून मौल्यवान साहाय्य दिले गेले हे देखील त्यांनी आवर्जून सांगितले.




### जायंटस् ग्रुपतर्फे मतदान करण्यासाठी शहरातील विविध भागांमध्ये जनजागृती

**सोलापूर, दि.६ मे-**

जायंटस् ग्रुप ऑफ सोलापूर या समाज सेवी संस्थेकडून नाना-नानी पार्क कर्णिक नगर, गीता नगर, अशोक चौक, व आसपासच्या भागातील नागरिकांना आपल्या मतदानाचा लोकशाही उत्सवाच्या माध्यमातून मतदान करण्यासाठी आवाहन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमास जायंट्स ग्रुपचे फेडरेशनचे डायरेक्टर श्रीनिवास कोंडले, डायरेक्टर किसन आडम,फेडरेशन चे माजी व्हा.प्रेसिडेंट नागनाथ कोंडा, मदनमोहन बुर्गुल, श्रीहरी बुरा, सिद्धेश्वर बोमड्याल, नागनाथ वड्डेपल्ली, व इतर सभासद उपस्थित होते.

# प्रत्येक ईव्हीएमची हजारवेळा तपासणी

## मतदानाच्या पूर्वसंध्येला जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची मशिनबाबत स्पष्टता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

ईव्हीएम/व्हीव्हीपॅटस् मशीन्स ऐन वेळी बंद होवू नये याची पुरेपूर काळजी जिल्हा प्रशासनाने घेतली असून, त्याची दोन वेळा चाचणी आणि गेल्या २ दिवसांपूर्वी पुन्हा किमान एक हजारवेळा मतदान करून तपासणी केल्याचा निर्वाळा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मतदानाच्या पूर्वसंध्येला दिला.



जिल्हाधिकारी म्हणाले की, मतदान प्रक्रियेत काही तांत्रिक कारणाने एखादी मशीन बंद पडली तर अवघ्या ४० मिनिटात नवीन मशीन मतदारांना मतदान करण्यासाठी भेटेल. ती मशीन मतदान केंद्रांवर व्यवस्थित बसविण्यासाठी किमान १० मिनिटे लागतील. या ठिकाणी पुन्हा एकदा तपासणी करण्यात येईल आणि अवघ्या १ तासात त्या केंद्रावरील मतदान पूर्ववत करण्याचे प्रशिक्षण कर्मचाऱ्यांना आम्ही दिले आहे. जिल्ह्यासाठी २० टक्के मशीन्स जास्तीच्या तयार आहेत.

प्रत्येक बुथवरील कर्मचाऱ्यांना लंच टाईम देण्यात आला नाही. दुपारच्या सत्रात एकेक करून प्रत्येकाने जेवण करायचे आहे. यामुळे मतदान प्रक्रिया चालूच राहणार आहे. ज्या ठिकाणी पैसे, मद्य व इतर भेटवस्तू, शस्त्राचा वापर, मतदारांना धमक्या देणे असे प्रकार निदर्शनाला आल्यास कारवाई करण्यात येणार आहे. यासाठी पोलिस कर्मचारी, आमची विशेष पथके यावर बारकाईने नजर ठेवून आहेत. आजपर्यंत आचारसंहितेच्या अनुषंगाने ४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तर एफएसटी, एसएसटी पथकांमार्फत तपासणीमध्ये ८ प्रकरणांमध्ये कारवाई करुन २९ लाख ७५ हजार ७८० इतकी रोख रक्कम ताब्यात घेण्यात आली आहे. जिल्ह्यात पोलिस विभागाकडून ७७ वेळा रूट मार्च काढण्यात आला आहे. सीएपीएफ, एसआरपी तुकड्याही यासाठी तैनात करण्यात आल्या आहेत.

उमेदवारांच्या खर्चाकडेही विशेष समितीचे लक्ष असून, येत्या २ दिवसात त्यांच्याही खर्चाची आकडेवारी आम्ही देणार असल्याचाही खुलासा जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी केला.

### जिल्ह्यातील दुष्काळावर लक्ष

जिल्ह्यात सध्या प्रचंड दुष्काळी स्थिती निर्माण झाली आहे. याचा सर्वाधिक फटका ग्रामीण भागातील जनजीवनाला बसत आहे. या ठिकाणचे नागरिकच नाहीतर जनावरांवरही उपासमारीची वेळ येणार आहे. कोणत्याही भागात पाणीटंचाई जाणवू नये या धर्तीवर उजनीच्या पाण्याचे नियोजन सध्या तरी केले आहे. सध्या जिल्ह्यात १२८ टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. जनावरांच्या चाऱ्याचेही जून एन्डपर्यंत नियोजन लावल्याने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे निवडणुकांबरोबर दुष्काळी भागावर विशेष लक्ष असल्याचे आज दिसून आले.

## मित्रानेच केली मित्राची फसवणूक

**सोलापूर, दि. ६ मे-**

कंपनीत पैसे गुंतविण्यास लावून मित्रानेच मित्राची १ लाख ७२ हजार रुपयांची फसवणुक केली. याबाबत अब्दुलरहिमान अल्ताफहुसेन काझी (वय ३७, रा. मदनी नगर, नडगिरी पेट्रोल पंपाशेजारी, विजापूर रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मोहसीन सलीम नदाफ उर्फ डी के मोहसनी (वय ३५, रा. पिरसाब मेंबर गल्ली, शास्त्री नगर) यांच्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. काझी व नदाफ हे एकमेकांचे मित्र आहेत. सन २०२३मध्ये नदाफ याने त्याची डी.के. एंटरप्रायजेस प्रा. लि. कंपनीची शाखा शास्त्री नगरमधील मदिना हॉटेल शेजारी काढली होती. या कंपनीत काझी यांना पैसे गुंतविण्यास नदाफ याने तयार केले. त्यानुसार काझी यांनी नदाफ यास वेळोवेळी ऑनलाईनद्वारे २ लाख ३७ हजार रुपये ट्रान्सफर केले. १२ जानेवारी २०२४ रोजी काझी यांनी डी.के.एंटरप्रायजेसच्या कार्यालयात जाऊन पाहिल्यावर तिथे कसल्याही प्रकारची साधनसामग्री दिसून आली नाही. आपली फसवणुक झाल्याचे लक्षात आल्याने काझी यांनी नदाफ यास दिलेले पैसे परत मागितले. काझी यांनी पोलिसांत तक्रार दिल्यानंतर नदाफ याने काझी यांना तक्रार मागे घे म्हणून ५० हजार रुपये ऑनलाईन दिले व उर्वरीत पैशासाठी चेक दिले. नदाफ याने दिलेले चेक न वटता परत आल्याने आपली फसवणुक झाली. स. पोलिस निरीक्षक अहिवळे पुढील तपास करीत आहेत.

## पोषणयुक्त केसांसाठी डीआयवाय हेअर मास्क

**सोलापूर, दि. ६ मे-**

केसांच्या भुरभुरेपणाला आटोक्यात ठेवण्याचा आणि त्यांना सखोल पोषण पुरविण्याचा एक परिणामकारक मार्ग म्हणजे केसांना नियमितपणे तेल लावण्याची सवय लावून घेणे. केशतेलांचे कितीतरी पर्याय बाजारात निवडीसाठी उपलब्ध असले तरीही त्यातून तुमच्या केसांसाठी योग्य घटकांचा समावेश असलेला पर्याय निवडण्याची गरज असते. कोरफड अर्थात ॲलो व्हेरा हा असाच एक घटक आहे, जो अनेक वर्षांपासून उन्हाळ्यासाठीचा सर्वात आवडता पर्याय राहीला आहे!ॲलो व्हेरासह खोबरेल तेलापासून बनवण्यात आलेल्या हेअर ऑईलचे हे अद्वितीय मिश्रण केसांच्या मुळांच्या जवळपास १० स्तरांपर्यंत खोलवर जाते आणि केस फ्रिझ्झी होण्याला नियंत्रण करते.ॲलो व्हेरा केसांची वाढ होण्यास, केसगळतीला प्रतिबंध करण्यास मदत करते, ज्यामुळे उन्हाळ्यादरम्यान केसांचे संरक्षण होण्यासोबत केसांचे आरोग्य सुधारते.

## भारत माता नगरात आजपासून अखंड हरिनाम सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

प्रति वर्षा प्रमाणे यंदाही रोडवरील भारत माता नगर येथील श्री प्रसन्नेश्वर दत्त मंदिरात दि. ७ ते १४ मे २०२४ या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संजय इनामदार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

दैनंदिन कार्यक्रमामध्ये पहाटे ५ ते ६ काकडा आरती, सकाळी ६ ते ९ ज्ञानेश्वरी पारायण सकाळी १० ते १२ गाथा भजन, दुपारी २.३० ते ४ महिला भजनी मंडळाचे भजन, दुपारी ४.३० ते ५.३० हरिपाठ, ६ ते ७ प्रवचन व रात्री ८ ते १० हरिकिर्तन आयोजित करण्यात आले आहे.

प्रवचन मालिकेमध्ये अनुक्रमे ह.भ.प.सर्वश्री निवृत्ती महाराज ताकमोगे, महादेव महाराज वाघमारे, सौ. वैशालीताई इनामदार, अमीन महाराज सय्यद, नरसाप्पा व्हनसुरे गुरुजी, मोहन व्हनराव, पंकज गुंड यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले आहे.

कीर्तन मालिकेमध्ये सर्वस्वी ह.भ.प.संजय पाटील महाराज, ह.भ.प. रमेश शिवापूरकर महाराज, ह.भ.प.गुरुवर्य हरि महाराज राशिनकर, ह.भ.प. कृष्णा महाराज चौरे, ह.भ.प. जगन्नाथ महाराज देशमुख, ह.भ.प. निवृत्ती महाराज नामदास, ह.भ.प. जयवंत महाराज बोधले व काल्याचे किर्तन ह.भ.प.अच्युत महाराज पुरी यांचे किर्तन आयोजित करण्यात आले आहे.

दि. ७ मे २०२४ रोजी रात्री ९ वाजता भगवान पवार, महुद व तानाजी घाडगे, पंढरपूर व सहकारी यांचे सोंगी भारुडाचा कार्यक्रम होणार आहे. रविवार दि. १२ मे २०२४ रोजी सकाळी ९ वाजता रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे. मंगळवार दि १४ मे २०२४ रोजी सकाळी ७ वाजता ग्रंथ दिंडी व पालखी सोहळा आयोजित केला आहे. सायंकाळी ७ वाजता काल्याच्या किर्तनानंतर महाप्रसादाच्या कार्यक्रमाने या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे. सर्व कार्यक्रमाचा व महाप्रसादाचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रसन्नेश्वर दत्त मंदिर भजनी मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेस नागनाथ पाटील, तुकाराम राऊत, अरुण साळुंखे, वैभव नागणे आदी उपस्थित होते.

## राज्यस्तरीय पथनाट्य स्पर्धेत दयानंद महाविद्यालयाने पटकाविले अव्वल स्थान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ मे-**

राज्यस्तरीय पथनाट्य स्पर्धेत दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक दयानंद काशिनाथ असावा हायस्कूल, तृतीय क्रमांक दयानंद आर्ट, सायन्स, कॉमर्स महाविद्यालय तर उत्तेजनार्थ रामभाऊ जोशी हायस्कूल, करकंब या संघाने मिळविला.

डी. पी. बी. दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या वतीने लोकसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा व नवमतदारांनी उत्स्फूर्तपणे आपला मतदानाचा अधिकार बजविण्यासाठी महाविद्यालयात ३२ हून अधिक विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. त्यामध्ये विद्यार्थ्यांसाठी घोषवाक्य स्पर्धा, निबंध स्पर्धा, ऑनलाईन मतदार जनजागृती व्हिडिओ स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चारोळी स्पर्धा, काव्य लेखन स्पर्धा इ. स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये भरपूर विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. त्याचप्रमाणे सजग नागरिकत्व प्रतिज्ञा, मतदान करण्याबाबत मतदार प्रतिज्ञा, यूट्यूब व्हिडिओ विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या जागृतीसाठी, विद्यार्थ्यांनी बनवलेले व्हिडिओ आदी उपक्रम सुध्दा राबवण्यात आले.

दरम्यानच्या काळात जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या उपस्थितीत व राज्य निवडणूक निर्णय अधिकारी श्रीकांत देशपांडे यांच्या हस्ते महाविद्यालयास मतदार जनजागृती निमित्ताने केलेल्या कार्यकर्त्यार्थ उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार देण्यात आला. विजेत्या संघांचे प्राचार्य डॉ. एस.बी.क्षीरसागर, प्रकल्प संचालक डॉ. सुधीर ठोंबरे, दयानंद शिक्षण समूहाचे प्रशासक डॉ. व्ही. पी. उबाळे यांनी कौतुक केले. स्पर्धेसाठी रोटरी क्लब ऑफ सोलापूर प्राईडचे सर्व सन्माननीय सदस्य दयानंद शिक्षण समूह सोलापूरच्या सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

डी. दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय, वेलणकर महाविद्यालय, दयानंद विधी महाविद्यालय, दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, रोटरी क्लब ऑफ प्राईड यांच्या संयुक्त विद्यमाने मतदान जनजागृती प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांचे हस्ते करण्यात आले.

रॅलीसाठी जिल्हा निवडणूक कार्यालयातील तहसीलदार श्रीमती ओसवाल, भावसार व सोमनाथ पवार उपस्थित होते. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही. पी. उबाळे हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. प्रमुख उपस्थिती म्हणून प्राचार्य डॉ.एस.बी. क्षीरसागर, प्राचार्य डॉ.एस.व्ही. शिंदे, प्राचार्य डॉ. एस.जी. गायकवाड आणि रोटरी क्लबचे रोटे. चव्हाण व रोट. उपाध्ये, रोट. राकेश उदगिरी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या नोडल ऑफिसर डॉ. एल.व्ही. बामणे व क्लबचे सर्व सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी सर्व प्राध्यापक व कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. रॅलीनंतर बक्षीस वितरण कार्यक्रम घेण्यात आला. मतदान जागृतीसाठी विविध स्पर्धामध्ये पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना तहसीलदार श्रीमती ओसवाल यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. मतदार जागृतीच्या विविध कार्यक्रमांसाठी अनेक तज्ञ व्यक्तींनी व शासकीय अधिकाऱ्यांनी महाविद्यालयास भेटी दिल्या. त्यामध्ये सदाशिव पडदुणे, सुधीर ठोंबरे, रूपाली भावसार, सोमनाथ पवार व सोलापूर विद्यापीठातील विविध अधिकारी व मान्यवरांनी महाविद्यालयाच्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढले. महाविद्यालयाचे विद्यार्थी अजूनही या कामी कार्यरत आहेत व मनोभावे सेवा करत आहेत. महाविद्यालयाचे विद्यार्थी एलसी क्लबचे सदस्य प्राचार्य व नोडल ऑफिसर यांचा दिनांक ३ मे रोजी टी-शर्ट व टोपी देऊन दहा सदस्यांचा सत्कार मुख्य निवडणूक अधिकारी सोलापूर यांच्या वतीने करण्यात आला.



## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा चंदनशिवे यांच्याकडून सत्कार

**सोलापूर, दि.६ मे-**

सोलापूर लोकसभा मतदारसंघातील भाजपा व महायुतीचे अधिकृत उमेदवार राम सातपुते यांच्या प्रचारार्थ अक्कलकोट येथे केंद्रीय रस्ते व वाहतुक मंत्री नितीन गडकरी यांच्या जाहिर सभेवेळी माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे यांच्यावतीने सत्कार करण्यात आला. अक्कलकोट येथे भाजपाचे जिल्हाध्यक्ष तथा आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या पुढाकाराने केंद्रीय मंत्री नितीन गडगरी यांची सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी हेलिपॅडवर गडकरी यांचे आगमन झाल्यानंतर माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे यांनी त्यांचा निळी टोपी घालून व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी माजी नगरसेवक गणेश पुजारी, चंद्रकांत सोनवणे, जयराज सांगे आदि उपस्थित होते.




**सोलापूर : मतदान जनजागृती करताना उमाबाई श्राविका विद्यालयाचे क्रीडाशिक्षक सुहास छंचुरे व गांधी नाथा रंगजी विद्यालयाचे क्रीडाशिक्षक शिवानंद सुतार.**

# अकलूज येथे तब्बल ४८० लिटर हातभट्टी दारु पकडली

## जिल्हाभरातील हातभट्ट्यांवरही राज्य उत्पादन शुल्क विभागाचे छापासत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

लोकसभा निवडणुकीच्या मतदानाला अवघे काही तास शिल्लक असून राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध दारू निर्मिती, विक्री व वाहतुकीविरुद्ध कारवाई तीव्र केली असून शनिवार-रविवारी राबविलेल्या विशेष मोहिमेत २० गुन्ह्यात विभागाने पावणे अकरा लाखांचा मुद्देमाल जप्त केला.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचे मतदान सात मे रोजी होणार असून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या आदेशाने जिल्हाभरात रविवारी सायंकाळी सहा वाजेपासून ड्राय डे घोषित करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून मागील ७२ तासांपासून अवैध दारू निर्मिती, विक्री व वाहतुकीविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यात आली. रविवारी अकलूज-



इंदापूर रोडवर अनिल धनसिंग राजपूत (वय ३८, रा. बक्षीहिप्परगा, ता. दक्षिण सोलापूर) हा त्याच्या हुंडाई सेंट्रो कार क्रमांक एमएच १२ एएन ५६२७ मधून चार रबरी ट्यूबमध्ये ४८० लिटर हातभट्टी दारूची वाहतूक करताना पकडले. त्याच्या ताब्यातून दोन लाख तेवीस हजार आठशे रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई निरीक्षक सचिन भवड, दुय्यम निरीक्षक बाळू नेवसे, सहायक दुय्यम निरीक्षक आलेत शेख, जवान गजानन जाधव, तानाजी जाधव व वाहन चालक मारुती जडगे यांचे पथकाने केली.

रविवारी सकाळच्या सुमारास दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुळेगाव तांडा येथील विविध हातभट्टी ठिकाणांवर धाडी टाकून १८० लिटर हातभट्टी दारू व १२,४५० लिटर गुळमिश्रित रसायन असा एकूण चार लाख ८६ हजार ९५० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. शनिवारी केगाव शिवाजीनगर परिसरातील हातभट्टी ठिकाणावर छापा टाकून रुकेश लक्ष्मण चव्हाण (वय २१) यास ३५०० लिटर रसायनासह पकडले. केगाव येथील देशमुख वस्ती येथे हातभट्टी ठिकाणावर छापा टाकून सातशे लिटर रसायन जप्त करून जागीच नाश केले. वैराग (ता. बार्शी) येथून अजित बाबासाहेब करांडे यास साडेचार लिटर विदेशी दारू विक्री करताना पकडले तसेच सौरभ बाळू गेले यास पावणेदहा लिटर बियर व साडेपाच लिटर विदेशी दारू विक्री करताना उपळाई (ता. बार्शी) या ठिकाणी गुन्हा नोंदवला. अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्याच्या हद्दतील हॉटेल त्रिशूल मधून अल्ताफ रमजान शेख याच्या ताब्यातून विदेशी दारूच्या बाटल्या व अक्कलकोट ते हन्नूर रोडवरील प्रशांत चायनीज मधून विनायक अशोक जाधव याच्या ताब्यातून विदेशी दारूच्या बारा सीलबंद बाटल्या जप्त केल्या. महूद (ता. सांगोला) येथील हातभट्टी ठिकाणावर छापा टाकून ९०० लिटर रसायन जागीच नाश केले तसेच लखन रामचंद्र पवार याला दुचाकीवरून प्लास्टिक कॅन मधून ३५ लिटर हातभट्टी दारूची वाहतूक करताना पकडले. शिंगोर्णी (ता. माळशिरस) येथे अजित उत्तम बोडरे याच्या ताब्यातून देशी दारूच्या २७ बाटल्या जप्त केल्या. हतीद (ता. सांगोला) या ठिकाणी रखमाजी बाळा शिंदे याच्या हातभट्टी ठिकाणावर छापा टाकून ९५० लिटर रसायन जप्त करून जागीच नाश केले. भाळवणी (ता. करमाळा) येथून दत्तू सोपान काळे याला ३० लिटर हातभट्टी दारू व ८०० लिटर रसायनासह अटक केली. पोहोरगाव (ता. पंढरपूर) येथून लतिका हंबीर काळे या महिलेच्या ताब्यातून देशी दारूच्या ५५ सीलबंद बाटल्या जप्त केल्या. तोगराळी (ता. दक्षिण सोलापूर) येथे लक्ष्मीनारायण बालय्या मच्छा यांच्या ताब्यातून सत्तर लिटर ताडी व जिजाबाई देवेंद्र तेलंग या महिलेच्या ताब्यातून २४ लिटर ताडी जप्त करण्यात आली.

### आज ड्राय डे

५ मे सायंकाळी सहा वाजेपासून ड्रायडे घोषित करण्यात आला असून सर्व मद्य विक्री दुकाने सात मे रोजी मतदान संपेपर्यंत बंद राहतील. राज्य उत्पादन शुल्क विभागाने या कालावधीत जिल्हाभरात एकूण बारा पथके नेमण्यात आली असून या पथकांकडून धाबे, होटल, संशयित मद्य विक्री ठिकाणे, हातभट्टी दारू निर्मिती ठिकाणे इत्यादी ठिकाणांवर छापे टाकण्यात येत आहेत. तसेच वागदरी (ता. अक्कलकोट), नांदणी (ता. दक्षिण सोलापूर) व मरवडे (ता. मंगळवेढा) या ठिकाणी कर्नाटक राज्य सीमेवरील सीमा तपासणी नाक्यांवर वाहनांची कसून तपासणी करण्यात येत आहे. अधीक्षक व उपअधीक्षक यांच्याकडून रात्रीच्या वेळी परिसरात गस्त घालण्यात येत असून कुठेही दारूची वाहतूक किंवा वाटप होणार नाही यावर कडक लक्ष ठेवण्यात येत आहे.

### ३२३ आरोपींना अटक

आचारसंहिता कालावधीत राज्य उत्पादन शुल्क विभागाने एकूण ४०२ गुन्ह्यात ३२३ आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत १२ हजार ६५४ लिटर हातभट्टी दारू, एक लाख ७३ हजार ३२० लिटर गुळमिश्रित रसायन, ७०५ लिटर देशी दारू, ३४५ लिटर विदेशी दारू, २०६ लिटर बियर, १७२७ लिटर ताडी, २४३ लिटर गोवा राज्यातील दारू व ४७ वाहने जप्त केली आहेत. जप्त केलेल्या दारू व इतर साहित्याची किंमत ८९ लाख १८ हजार असून वाहनांसह एकूण जप्त मुद्देमालाची किंमत एक कोटी ३६ लाख आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी- ७६३

**भले म्हणवितां संतांचे सेवक ।**
**आइत्याची भीक सुखरुप ।।**

प्रत्येकांनी आपणाला चांगले म्हणावे असे जवळपास प्रत्येकालाच वाटत असते. पण आपण इतरांना चांगले म्हणावे असे फार कमी लोकांना वाटत असते. खरे म्हणजे चांगल्यांना चांगले म्हणणे योग्य असतांनाही आपण सहजपणे चांगल्यांनाही चांगले म्हणत नाही. इतरांना आपण सहजपणे चांगले म्हणत नाही, कारण आपणाला आपण त्याच्यापेक्षा कांही कमी नाहीत, असे वाटत असते. इतरांना चांगले म्हणण्याने आपणाला कमीपणा न येता खऱ्या अर्थाने म



ोठेपणा येत असतो, हे माणूस विसरत असतो. इतरांना मोठे, चांगले म्हणण्यासाठी आपल्याकडे मनाचा मोठेपणा, हृदयाचा चांगुलपणा असावा लागतो. जो दुसऱ्यांचा मोठेपणा, चांगुलपणा मान्य करतो, तो खऱ्या अर्थाने मोठा व चांगला असतो. चांगल्यांना चांगले म्हणण्याने आपले काही बिघडत नाही, उलट आपल्याही मनात चांगुलपणा रुजायला लागतो. चांगल्यासारखे आपणही व्हावे असे आपणाला वाटू लागते. एखाद्या वाईटाचा मालक बनण्यापेक्षा चांगल्याचा सेवक बनणे फायदेशीर असते. संत महात्म्यांचे आम्ही सेवक आहोत किंवा संत महात्म्यांना मानतो असे म्हटल्याने कळत न कळत संत महात्म्यांतील सद्गुण आपण अंगीकारू लागतो. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**भले म्हणविता संतांचे सेवक ।**
**आइत्याची भीक सुखरुप ।।**

संतांचे सेवक झाल्याने त्यांच्याकडील ज्ञानाचा ठेवा सहजपणे आपणाला प्राप्त होतो हे संतवचन ज्यांना अनुभवता आले ते खरोखरच भाग्यशाली आहेत. संसारात अडकलेल्या जीवाला माया, मोह, ईर्षा, द्वेष, मत्सर, अहंकार, मीपणा, काम, क्रोध आदींनी घेरल्याने हा जीव त्यांच्यापासून दूर जाऊन चांगल्यांना पाहू शकत नाही. मी म्हणजेच सर्वस्व किंवा माझ्यासारखा इतर कोणी चांगला, मोठा नाही अशी समज करून हा जीव जीवन जगतो आहे. समोरच्याने कितीही चांगले कार्य केले तरीही या जीवाला मनाभावातून त्याचे कौतुक करावेसे वाटत नाही. उलट त्याच्यात कांही खोड काढता येते का, याचा शोध हा जीव घेत असतो. सून कितीही चांगली वागली तरी काही घरात सासू कांहीतरी उणीव शोधत राहते. सासू चांगली वागत असली तरीही काही ठिकाणी त्यांना चुकीचे ठरवले जाते. सत्ता चालवणाऱ्यांनी कितीही चांगल्या गोष्टी केल्या तरी विरोधक त्यात त्रुटी काढतच असतात. चांगल्यात उणीव शोधण्याची किंवा मुक्तकंठाणे चांगल्यांना चांगले न म्हणण्याची सवय माणसाला केवळ मीपणामुळे लागते. ही सवय कोणासाठीही चांगली नाही. उलट ही सवय नुकसानीला कारणीभूत ठरू शकते. चांगल्यांना चांगले म्हटले किंवा चांगल्याचा सहवास मिळविला तर त्यांच्यातील बरेच गुण आपण सहजपणे आत्मसात करतो. अर्थात, आपल्यातील दुर्गुन कमी होऊन चांगुलपणात वाढ होऊ शकते. चांगुलपणा स्विकारतांना लहान-मोठा, स्त्री-पुरुष, उच्च-निच असा कसलाही भेद न करता चांगुलपणा हा चांगुलपणाच म्हणून त्याचा स्विकार करावा.

**जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : मंगळवार**
**दि. ७ मे २०२४**
**विक्रम संवत् २०८०,**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - चैत्र**
**कृ. चतुर्ददशी (११.४१)**
**ऋतु - वसंत**
**नक्षत्र- अश्विनी (१५.३२)**
**योग - आयुष्मान (२०.५८)**
**करण - चतुष्पाद (२२.१४)**
**सुर्योदय - ६.१०**
**सुर्यास्त - १९.०१**
**दिनविशेष-**
**परदेशिया सत्तू अमावास्या, दर्श अमावास्या (स.११.४१ पर्यंत), वेणीराम महाराज पु.ति. मिरज, सती रमा यात्रा ता. कडेगाव**

**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३ ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष** : अपेक्षित मित्रांची मदत मिळेल. नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. दाम्पत्य जीवन सुखी राहील.

**वृषभ** : व्यावहारिक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. व्यापार, नोकरीमधील स्थिती मध्यम राहील.

**मिथुन** : तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफिकीरीने कामे करून नका.

**कर्क** : आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. काही घटनांमध्ये आपल्याला आज मनस्ताप सहन करावा लागेल.

**सिंह** : संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा.

**कन्या** : लोकांशी संपर्क वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार-व्यवसायात विस्तार होईल.

**तुळ** : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक** : व्यवसायात कामाचा व्याप वाढेल. व्यवसायात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता.

**धनु** : प्रतिष्ठित व्यक्तींची भेट फायदेशीर ठरणार आहे. संतोष निर्माण होईल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधान.

**मकर** : उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पूर्ण होण्याचा योग आहे.

**कुंभ** : मुलांच्या हट्टापायी चैनीच्या वस्तूसाठी खर्च करावा लागेल. सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन** : कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकार्य कमी प्रमाणात मिळेल. व्यवहारात फायदा मिळेल.

# सकाळी सातपासूनच मतदान करा...!

### सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विजया पांगारकर

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. ६ मे-**

माढा लोकसभा मतदारसंघासाठी मंगळवार ७ मे रोजी मतदान होत असून माळशिरस विधानसभा मतदारसंघातील प्रशासनाची निवडणुकीची तयारी पूर्ण झाली आहे. उन्हाची तीव्रता जास्त असल्याने मतदारांनी सकाळी ७ ते ९ या वेळात आपला मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विजया पांगारकर यांनी केले.

माळशिरस येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. यावेळी अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सुरेश शेजूळ उपस्थित होते. तालुक्यात ३ लाख ३७ हजार ३८६ मतदार असून यामध्ये १ लाख ६२ हजार ३८ महिला तर १ लाख ७५ हजार ३१७ पुरुष मतदार आहेत. यामध्ये २ हजार १८ दिव्यांग, ४ हजार ९११ मतदार ७५ वर्षावरील आहेत. तालुक्यात ३३८ मतदान केंद्र आहेत. या निवडणूक प्रक्रियेसाठी अडीच ते तीन हजार कर्मचाऱ्यांना १० सेशनमध्ये ट्रेनिंग दिले आहे. तालुक्यातील १,५०० कर्मचाऱ्यांची नेमणूक माढा, सांगोला, करमाळा, बार्शी याठिकाणी झाली असून त्यांना त्याठिकाणी जाण्याकरिता बसची व्यवस्था करण्यात आली आहे. तालुक्यातील मतदान केंद्रांवर कर्मचाऱ्यांना जाण्यासाठी ५२ बस व १३ क्रुझर जीपची व्यवस्था करण्यात आली आहे. या प्रत्येक वाहनाला जीपीएस सिस्टीम असणार आहे. यासाठी दोन इंजिनियर असणार आहेत. १,५०० कर्मचारी व ६५० पोलीस कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. ३५ झोनल ऑफिसरांची नेमणूक करण्यात आली आहे. मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. गत वर्षी ज्याठिकाणी कमी मतदान झाले. त्याठिकाणी समक्ष जाऊन जनजागृती करण्यात आली आहे. मतदान केंद्रावर पाण्याची सोय करण्यात आली आहे. सावलीची व्यवस्था करण्यात आली आहे. तापमान जास्त असल्याने मतदारांनी सकाळी ७ ते ९ व सायंकाळी ४ ते ६ वाजता मतदान करावे. रांगामध्ये बसण्यासाठी बेंच ठेवण्यात येणार आहेत. मतदान केंद्रावर पाणी, ओआरएस पाकीट, मेडिकल कीट ठेवण्यात येणार आहे. वैद्यकीय सेवा, ॲम्ब्युलन्स असणार आहे. नागरिकांनी मतदानासाठी बाहेर पडताना टोपी, छत्रीचा वापर करावा. प्रत्येक मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजवावा असे आवाहन विजया पांगारकर यांनी केले आहे.




### नातेपुते येथे एक दिव्यांग केंद्र

नातेपुते या ठिकाणी सर्व दिव्यांग कर्मचारी असणार आहेत. विशेष मतदान केंद्रासाठी अनेक कर्मचारी स्वत:हून पुढे आले. प्रक्रियेत सहभाग घेतला हे कौतुकास्पद आहे.

### ४ गावांतील शाळेच्या इमारतीमध्ये पाचपेक्षा अधिक मतदान केंद्रे

फोंडशिरस ५, खुडूस ६, कोळेगाव ५, मळोली ५ मतदान केंद्र आहेत. मतदारांना आपले मतदान केंद्र ओळखता यावे, यासाठी मतदान केंद्र क्रमांक वेगवेगळ्या कलरमध्ये टाकण्यात येणार आहेत. मतदारांना मतदान केंद्र शोधण्यासाठी वेळ लागू नये यासाठी स्यंयसेवक नेमण्यात आले आहेत.

### माळशिरस, सदाशिवनगरमध्ये महिला बूथ

माळशिरस व सदाशिवनगर येथील प्रत्येकी एका बुथवर सर्व महिला कर्मचारी असणार असून त्या बुथची सजावट करण्यात येणार आहे.

### प्रत्येक मतदान केंद्राला तीन बॅलेट युनिट

माढा लोकसभेसाठी ३२ उमेदवार व एक नोटा असे ३३ बटण आहेत. एका मशिनला १६ नावाची मर्यादा असल्याने प्रत्येक मतदान केंद्रावर तीन बॅलेट युनिट बसवावे लागणार आहेत. त्याचे नियोजन करण्यात आल्याचेही पांगारकर यांनी सांगितले.

### ४१० मशीन तयार

३३८ मतदान केंद्रांवर ३३८ युनिट लागणार असून अचानक एखाद्या युनिटला तांत्रिक अडचण आली तरी तत्काळ युनिट देता यावे यासाठी ४१० मशीन तयार ठेवण्यात आल्या आहेत.

### बचेरी, भाम येथे युथ बूथ

बचेरी, भाम या दोन मतदान केंद्रांवर युवक कर्मचारी असणार आहेत. ही दोन्ही गावे टंचाई पट्ट्यामधील आहेत. टंचाईवर काय उपाययोजना करता येतील त्याचे पोस्टर तयार करण्यात आली असून त्यामधून जनजागृती केली जाणार आहे



## अन्नछत्र सकारात्मक ऊर्जा देणारे स्थान : आ. राठोड

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ६ मे-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून उत्तम दर्जाच्या सोयीसुविधा दिल्या जात असून, अन्नछत्र हे सकारात्मक उर्जा देणारे पवित्र ठिकाण असल्याचे मनोगत आ. राजेश राठोड यांनी व्यक्त केले.

श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. त्यांच्या समावेत लाला राठोड, वालू चव्हाण, विकास राठोड, प्रकाश राठोड, भीमा नाईक, मोतीराम चव्हाण, संजय चव्हाण, न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, मनोज निकम, एस. के. स्वामी, बाळासाहेब घाडगे, सिद्धाराम कल्याणी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, कल्याण देशमुख, सतीश महिंद्रकर, मल्लिनाथ कोगणुरे, शावरेप्पा माणकोजी, शिवकुमार स्वामी, निखिल पाटील, प्रविण घाडगे, विजय माने, नामा भोसले, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे, चंद्रकांत हिबारे, राहुल इंडे, काशिनाथ वाले, विश्वनाथ कलशेट्टी उपस्थित होते.

## पंढरीत मतदान जागृतीसाठी सायकल फेरी

### अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचा उपक्रम

### पोलिसांसह दिव्यांग प्रतिनिधी, नागरिकांचा सहभाग




**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ६ मे-**

मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी सायकल फेरीचे आयोजन हा अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचा स्तुत्य उपक्रम आहे अशा भावना शहर पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी केले.

सायकल फेरीच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. सध्या देशभर लोकसभा सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम सुरू आहे. निवडणूक आयोगाने मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी विविध पातळीवरून प्रयत्न सुरू केले आहेत. आवाहन करण्यात येत आहे त्यास प्रतिसाद देत अखिल भारतीय ग्राहक पंचायतीतर्फे पंढरपूर सायकलर्स क्लब व कोर्टी रोड सायकल क्लब यांच्यासह पंढरपूर शहरातून सायकल फेरीचे आयोजन करण्यात आले होते. त्यास उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद सोलापूरचे दिव्यांग प्रतिनिधी ननवरे, दतात्रय खताळ, सागर अष्टेकर, लवंड व त्यांचे सहकारी या दिव्यांग मतदार जागृतीसाठी सायकल फेरीमध्ये सहभागी झाले होते. त्यांचाही गौरव पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी केला. ही सायकल फेरी शहरातील भोसले चौक, अर्बन बँक-भादुले चौक, नाथ चौक, प्रदक्षिणा मार्गावरून शहर पोलीस ठाण्यात विसर्जित झाली. यामध्ये अ. भा. ग्राहक पंचायतीचे जिल्हा सचिव सुहास निकते, जिल्हा सदस्य पांडुरंग अल्लापूरकर, तालुकाध्यक्ष विनय उपाध्ये, संघटक महेश भोसले, सचिव प्रा. धनंजय पंधे, उपाध्यक्ष नंदकुमार देशपांडे, आझाद अल्लापूरकर, सदस्य सागर शिंदे, दिलीप पाठक, श्रीराम साळुंखे, पंढरपूर सायकलर्स क्लबचे सूरज अष्टेकर, संतोष पाटोळे, अभिजीत गोंजारी, सुनिल क्षीरसागर, संतोष कवडे, व्ही. एम. पाटील, अमर देशमुख, राजू भाटिया, मोहन बोडके तसेच कोर्टी रोड सायकल क्लबचे के. जी. जाधव, शाम तापडिया, श्रीनाथ साळुंखे, ढोबळे आदी उपस्थित होते. सायकल फेरी व्यवस्थित पार पाडण्यासाठी शहर पोलीस स्टेशन वाहतूक शाखेचे सपोनि जनार्दन हेगडकर व त्यांचे सर्व सहकारी पोलिस कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

### समस्या सोडवण्याबरोबरच प्रबोधनाचे काम

प्रारंभी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हा संघटक दीपक इरकल यांनी प्रास्ताविकामध्ये सायकल फेरीचा उद्देश स्पष्ट करुन उपस्थित सर्वांचे स्वागत केले. जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी ग्राहक पंचायत समस्या सोडविण्याबरोबरच ग्राहक प्रबोधनाचे महत्त्वाचे काम करते त्याचाच एक भाग म्हणून मतदार जनजागृती मोहीम सुरू केली आहे. त्यातील सायकल फेरी हा उपक्रम आयोजित केल्याचे सांगितले.

## पंढरपूरचा श्री कालिकादेवी उत्सव भक्तिभावात साजरा

### सोमवंशी क्षत्रिय कासार समाजाची कुलदेवता

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ६ मे-**

सोमवंशी क्षत्रिय कासार समाजाची कुलदेवता असलेल्या पंढरपूरच्या श्री काळिकादेवीचा उत्सव मोठ्या थाटामाटात व भक्तिभावात पार पडला.

श्री कालिका मातेची बग्गीमधून बँड पथकाच्या गजरात थाटामाटात मिरवणूक काढण्यात आली. श्री कालिका मातेच्या या मिरवणुकीमध्ये समाजातील सर्व लहान-थोर, ज्येष्ठ बंधू, भगिनी युवक, युवती सहभागी झाले होते. मंदिरापासून या मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला. शहरातील प्रदक्षिणा मार्गावरुन मार्गक्रमण करीत ही मिरवणूक पुन्हा कालिकादेवी मंदिरात आली. यावेळी प्रदक्षिणा मार्गावर कासार समाज बांधवांकडून मिरवणुकीतील सहभागी झालेल्या मंडळींसाठी थंडगार पिण्याचे पाणी, लिंबू सरबत, रसना तसेच लहानग्यांसाठी आईस्क्रीम आणि थंडगार कुल्फीचे वाटप करण्यात आले.



मिरवणूक मंदिरात पोहोचल्यानंतर सामुदायिक महाआरती करण्यात आली. त्यानंतर मंदिरात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार अखिल भारतीय कासार समाज मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष शरद भांडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास बाळासाहेब होरणे, सत्यविजय मोहोळकर आणि सोमनाथ होरणे आदींसह समाजातील जेष्ठ मंडळी तसेच समाजबांधव आणि सर्व कार्यकारी मंडळ उपस्थित होते. सत्कार समारंभानंतर महाप्रसादाचे आयोजनदेखील करण्यात आले होते. कासार समाजबांधवांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

### स्वागत तोडकर यांचे व्याख्यान

कालिका देवी मंदिरात स्वागत तोडकर यांचे निसर्गोपचार या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानासदेखील कासार समाज बांधवांबरोबर शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष म्हणजे हे व्याख्यान ऐकण्यासाठी महिला वर्गाची उपस्थिती मोठी दिसत होती.

### चंदनउटी पूजेवेळी गर्दी

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कालिकादेवीच्या मूर्तीला उटीपूजा करण्यात आली. चंदन उटी पूजेनंतर श्री कालिका मातेचे मनमोहक दृश्य पहाण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती.



## माता-बालक उत्कर्ष प्रतिष्ठानात सेवानिवृत्ती सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ६ मे-**

उत्कर्ष बालक मंदिरच्या मुख्याध्यापिका सुनीता कुलकर्णी व सहशिक्षिका राजाक्का साळुंखे यांचा सेवानिवृत्ती सोहळा पार पडला.

याप्रसंगी संस्थाअध्यक्षा डॉ. संजीवनी केळकर, कोषाध्यक्ष डॉ. शालिनी कुलकर्णी, प्राचार्य सुनील कुलकर्णी, मुख्याध्यापिका विश्रांती मागाडे, सेवानिवृत्त नायब तहसीलदार पी. व्ही. कुलकर्णी, विश्वनाथ कुलकर्णी, प्राचार्य आनंद कुलकर्णी, मारुती साळुंखे उपस्थित होते. स्वागत गीत शुभांगी कवठेकर यांनी गायन केले. डॉ. शालिनी कुलकर्णी यांनी बाल शिक्षण व बाल संस्काराचे कार्य अमूल्य असल्याचे सांगितले. यावेळी स्वप्ना कुलकर्णी, मनीषा पाटणे, वर्षा रास्ते, सुनील कुलकर्णी, मंगल कुलकर्णी, सुनीता कुलकर्णी, अनंत कुलकर्णी, वैष्णवी कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक संध्या शास्त्री यांनी केले तर सूत्रसंचालन धनश्री सोनंदकर यांनी केले.

## साक्षीदारांच्या जबाबांमध्ये विसंगती; एकजण निर्दोष

### निवडणूक कामात कसूर

### आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ६ मे-**

उस्मानाबाद मतदारसंघाच्या २०१४ च्या लोकसभा निवडणुकीच्या कामकाजात वारंवार टाळाटाळ करुन कर्तव्यात कसूर केली व निवडणुकीचे कामकाजात जाणून-बुजून अडथळा निर्माण केला. या कारणावरुन भारतीय लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ चे कलम १३४ अन्वये दाखल केलेल्या खटल्यातून आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली.

सन २०१४ मध्ये लोकसभा निवडणुकीसंदर्भात निवडणूक प्रक्रिया सुरु होती. फिर्यादी विलास अंबादास महाजन यांनी बार्शी शहर पोलीस स्टेशनमध्ये आरोपीच्या विरुद्ध कर्तव्यात कुसूर केल्याबद्दल तक्रार दाखल केली. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार आरोपी यांची सेक्टर ऑफिसर क्रमांक ३० मध्ये निवडणूक प्रक्रियेसाठी नेमणूक करण्यात आली होती. आरोपींना त्यांचे असणारे कर्तव्याची माहिती व जाणीव करुन देण्यात आली होती.



आरोपीकडे कार्यालयाकडे दैनंदिन अहवाल सादर करणे, विविध माहिती सादर करणे, मीटिंगसाठी वेळोवेळी हजर राहणे, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे किंवा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी ज्याज्यावेळी आदेश देतील त्याप्रमाणे कामकाज करणे, अशी कामे सोपविण्यात आली होती. परंतु आरोपींनी त्यांच्या कर्तव्यात कुसूर केल्यामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी आरोपीला वेळोवेळी चार नोटीसा पाठवून खुलासा सादर करण्यासाठी कळविले होते. परंतु आरोपींनी कामात कुसूर केल्याबाबत कुठलाही खुलासा सादर केला नाही. दि. १० एप्रिल १४ रोजी उस्मानाबाद येथे हजर राहून मतदानासाठी निवडणूक यंत्र तयार करण्यासाठीच्या महत्त्वाच्या कामीही आरोपी गैरहजर राहिले होते. यावरुन आरोपीनी निवडणुकीच्या कामात वारंवार टाळाटाळ तसेच दिरंगाई केल्याचे दिसून आले. त्यामुळे फिर्यादी विलास महाजन यांना वरिष्ठांनी आरोपीच्या विरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्याकरिता लेखी कळवले. त्यावरुन आरोपीच्या विरुद्ध फिर्याद देण्यात आली. तत्कालीन तपासणी अधिकाऱ्यांनी गुन्ह्याचा तपास करून साक्षीदारांची जाबजबाब घेऊन बार्शी येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांच्याकडे दोषारोप पत्र दाखल केले.

सदर केसची सुनावणी बार्शी येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग जे. आर. पठाण यांच्यासमोर झाली. सरकार पक्षातर्फे पाच साक्षीदार तपासण्यात आले. साक्षीदारांच्या जबाबदातील विसंगती निदर्शनाला आणून दिल्याने आरोपीतर्फे करण्यात आलेला युक्तिवाद ग्राह्य धरुन आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली. सदर प्रकरणांमध्ये आरोपीच्यावतीने ॲड. शिवाजी क्षीरसागर यांनी काम पाहिले व त्यांना ॲड. अक्षय बिडबाग तसेच ॲड. पवन क्षीरसागर यांनी सहकार्य केले.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## आचारसंहितेचा भंग करणाऱ्यांवर गुन्हे दाखल

**सोलापूर, दि. ६ मे -**
आदर्श आचारसंहितेचा भंग करणाऱ्यांवर जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे शाखा अभियंता पुरुषोत्तम सुदाम हरिसंगम यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन महेश मधुकर पाटील (रा. वरळेगाव, ता. दक्षिण सोलापूर) आणि विशाल वासुदेव उपाध्ये (वय ४२, रा. श्रध्दा अपार्टमेंट, बाळे, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ४ मे रोजी सायंकाळी सम्राट चौकातील चंडक पॉलिटेक्निक कॉलेज येथे महेश पाटील हे त्यांच्या (क्र. एम. एच. ०१/ ए. सी. ९७८४) या चारचाकी गाडीच्या बॉनेटवर भारतीय जनता पार्टीचा झेंडा लावलेले मिळून आले. पाटील यांनी आदर्श आचारसंहितेचा भंग केल्याबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक फौजदार ओव्हळ तपास करीत आहेत, तर ५ मे रोजी सकाळी मंगळवार पेठ पोलिस चौकीसमोर विशाल उपाध्ये हे त्यांच्या (क्र. एम. एच. १३/पी. ३५७४) या दुचाकीवर भाजपचे कमळ चिन्ह असलेले स्टिकर चिकटवून जाताना मिळून आले. उपाध्ये यांनी आदर्श आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार शेख पुढील तपास करीत आहेत.



माळशिरस येथील मतदान केंद्रावर महिलांचे व्यवस्थापन असणार आहे. यामुळे त्याची तयारी करताना महिला कर्मचारी.



# बा विठू माऊली...
# कधी मिळणार आम्हाला सावली...

### हिंदूत्ववादी संघटनांचा मंदिर प्रशासनाला सवाल

### रणरणत्या उन्हाचे चटके सहन करत वारकऱ्यांवर दर्शन घेण्याची वेळ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ६ मे-**
नुकत्याच पार पडलेल्या वरुथिनी एकादशी दिवशी विठुरायाच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांना कडक उन्हाचा सामना करत विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घ्यावे लागले. दर्शन रांगेवर अनेक ठिकाणी सावलीसाठी अच्छादन नसल्याने भाविक ४२ ते ४३ अंशसेल्सिअस तापमानात दर्शनासाठी दर्शन रांगेतून जात होते. या प्रकारावरुन ङ्गबा विठ्ठला... तुच माऊली, आम्हाला कधी मिळणार सावलीङ्घ असा संतप्त सवाल वारकऱ्यांबरोबरच हिंदुत्वावादी संघटना मंदिर प्रशासनाला विचारत आहेत.

रणरणत्या उन्हाचे चटके सहन करत दर्शन रांगेत थांबलेल्या भाविकांच्या व्यथा बा विठ्ठला मंदिरातील एसी कार्यालयात बसणाऱ्या मंदिर प्रशासनातील अधिकाऱ्यांनाकधी कळणार असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. पंढरपूर येथे सध्या प्रचंड उन्हाचा तडाका जाणवत असून येथील तापमान गेल्या आठ ते दहा दिवसांपासून ४० ते ४३ अंशसेल्सिअस इतके आहे. एकीकडे अशी परिस्थिती असताना विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकऱ्यांची परवड मात्र काही थांबलेली दिसत नाही. वरुथिनी एकादशी नुकतीच शनिवारी (ता. ४) पार पडली. या एकादशीला ऐन उन्हाच्या तडाक्यात श्री विठ्ठलाचे पदस्पर्श दर्शन होत नसल्याचे माहित असूनही केवळ मुख दर्शन तरी घडते आहे. या उद्देशाने भाविकांची मोठी गर्दी झालेली होती. भाविकांच्या गर्दीमुळे मुखदर्शनासाठी भाविकांची मोठी रांग दिसत होती. मात्र या रांगेतून जाताना सारडा भवन, तसेच इतर अनेक ठिकाणी भाविकांचे उन्हापासून संरक्षण होण्यासाठी दर्शन रांगेत कशाचीच सोय केलेली दिसत नव्हती. दर्शन रांगेवर अनेक ठिकाणी अच्छादनदेखील नसल्यामुळे वारकऱ्यांना चक्क कडक उन्हात थांबून विठुरायाचे मुखदर्शन घ्यावे लागले. दुसरीकडे दर्शन रांगेच्या मार्गावरच असणाऱ्या श्री एकवीरादेवी मंदिर परिसरात जे भाविक दर्शन रांगेत उभे रहातात, तेथील रस्त्यावर टाकलेल्या स्लॅबची खडी अक्षरश: वर आलेली आहे. ही खडी भाविकांच्या पायाला टोचते. त्यामुळे त्यावर ङ्गमॅटङ्घ टाकण्याची मागणी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर संरक्षण कृती समितीकडून करण्यात आलेली आहे. मात्र अद्याप या मागणीची देखील पूर्तता झालेली नाही. अन्य ठिकाणी असलेल्या मॅट या परिसरात टाकाव्यात, अशी सूचना देऊनही त्या न टाकल्याने वारकऱ्यांच्या पायाला ही खडी टोचत आहेत. याबरोबरच येणाऱ्या भाविकांना किमान २४ घंटे शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर संरक्षण कृती समितीचे अध्यक्ष गणेश लंके यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे वारंवार केली. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी मंदिर समितीच्या संबंधित अधिकाऱ्यांना सूचनाही दिल्या; मात्र त्या संदर्भात कोणतीही कृती न झाल्याने भाविकांचे हाल होत आहेत. तरी देखील मायबाप विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी घरातील प्रापंचिक अडचणींना तोंड देत येथे येऊन येथील अनेक अडचणींचा सामना करीत त्याबद्दल कोणतीही तक्रार न करता विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घडल्यानंतर सर्व सुख, समाधान मिळाल्याची भावना सर्वसामान्य वारकरी भाविकांकडून व्यक्त केली जात असते. विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती याकडे लक्ष देईल का असा प्रश्न उपस्थित होत आहे.



### अधिकारी एसीत... भाविक उन्हात...

मंदिरातील तसेच भक्तनिवासामधील मंदिर समितीच्या कार्यालयात स्वत: एसीमध्ये हवा खात बसलेल्या प्रशासनातील अधिकाऱ्यांना तसेच कर्मचाऱ्यांना उन्हात विठ्ठलाच्या दर्शनासाठी थांबलेल्या गोरगरीब वारकरी, भक्तांच्या वेदना बा.. विठ्ठला कधी कळणार असा संतप्त सवाल हिंदूत्ववादी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

## संक्षिप्त वृत्त...




### सोलापूरचे व्यंगचित्रकार उन्मेष शहाणे यांचा पुण्याच्या कार्टून कट्टातर्फे सत्कार

**सोलापूर, दि. ६ मे-**
विविध वृत्तपत्रे, मासिके तसेच अन्य सोशल मीडियावर आपली व्यंगचित्रे प्रसिद्ध करणाऱ्या काही निवडक दहा चित्रकारांचा सुप्रसिद्ध शिल्पकार प्रमोद कांबळे आणि सुप्रसिद्ध चित्रकार मिलिंद फडके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यात येथील उन्मेष शहाणे यांचा समावेश आहे. व्यंगचित्रकार आपल्या चित्रातून समजातील दोषावर तसेच समाज व्यवस्थेवर बोट ठेवत असतो. अशा काही निवडक व्यंगचित्रकारांच्या कार्याचा कौतुक सोहळा कार्टून्स कट्टा पुणे यांच्यामार्फत बालगंधर्व कला दालन येथे पार पडला.

### लायन्स क्लब ऑफ सोलापूर सिटीतर्फे बसव जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम, पुरस्कार वितरण

**सोलापूर, दि. ६ मे -**
जगद्ज्योती महात्मा बसवेश्वरांच्या जयंतीनिमित्त लायन्स क्लब इंटरनॅशनल अंतर्गत लायन्स क्लब ऑफ सोलापूर सिटीच्या वतीने बसव जयंतीनिमित्त तीन दिवस विविध कार्यक्रम व बसव मानद पुरस्काराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती लायन्स



क्लब सोलापूर सिटीचे अध्यक्ष लायन मोहन भूमकर यांनी पत्रकाद्वारे दिली. दि. १० मे रोजी बसव जयंतीनिमित्त कौंतम चौक येथे सकाळी ८.३० वाजता महात्मा बसवेश्वरांच्या पुतळ्यास पुष्पचक्र अर्पण करण्यात येणार आहे. यंदा १२ व्यक्तींना पुरस्कार देण्यात येणार असून, पुरस्कार वितरण नवनिर्वाचित प्रांतपाल मल्लिनाथ पाटील, माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम्म्हेत्रे, राजशेखर शिवदारे, उद्योजक प्रकाश हत्ती, सिध्देश्वर सहकारी बँकेचे उपाध्यक्ष नरेंद्र गंभीरे, मोहन भुमकर, उद्योजक ईरप्पा सालंक्की, सोमशेखर भोगडे यांच्या उपस्थितीत होणार आहे. बसव पुरस्कार वितरण दि. ९ मे रोजी सायंकाळी ५.३० वाजता हॉटेल समृध्दी सिध्देश्वर पेठ, सोलापूर येथे होणार आहे. यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन सचिव डॉ. श्रीकांत शृंगारपुरे यांनी केले आहे. बसव पुरस्काराचे मानकरी : गुरुशांत ढंगे, विद्याधर शाबादी, सदानंद हब्बू मल्लिनाथ कटप, मुगेंद्रप्पा चडचणकर, सिध्देश्वर किणगी, श्रीमंत माळगे, मल्लिकार्जुन मळसिध्दनवरू, कृष्णा रायचूरकर, श्रीदेवी यळमेली, भीमाशंकर करजगीकर, चनबसु माळगे यांना यंदाचे पुरस्कार देण्यात येणार आहे. पुरस्काराच्या मानकऱ्यांची निवड निवड समितीने केली आहे.



### स्पर्धा परीक्षेसाठी कठोर परिश्रम, जिद्द, चिकाटी आवश्यक : स्वाती राठोड

**सोलापूर, दि. ६ मे -**
स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, जिद्द, चिकाटी, इच्छाशक्ती व अभ्यासात सातत्य ठेवणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन यूपीएससी परीक्षेत यश प्राप्त केलेल्या स्वाती राठोड यांनी व्यक्त केले. सोलापूर जिल्हा तलवारबाजी संघटना व ऑल स्टार फेन्सिंग क्लब यांच्या वतीने यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या स्वाती राठोड यांचा सत्कार कार्यक्रम आयोजित केला होता, यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी, कोणकोणते पुस्तक वाचावे तसेच या परीक्षेची तयारी केव्हापासून करावी, याविषयी सखोल मार्गदर्शन केले. खेळाडूंनी विचारलेल्या विविध प्रश्नांची उत्तरे त्यांनी दिले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. दीपक शिंदे यांनी केले. परिचय श्वेतांबरी मालप-होमकर यांनी करुन दिला. आपल्या अध्यक्षीय भाषणात राज्य संघटनेचे उपाध्यक्ष प्रकाश काटुळे यांनी खेळाडूंना खेळाबरोबरच स्पर्धा परीक्षेमध्ये आपली आवड निर्माण करून भविष्यात त्यामध्येही यश मिळवावे असे आवाहन केले. सूत्रसंचालन श्रुतिका चव्हाण यांनी केले तर आभार प्रदर्शन पवन भोसले यांनी केले.

## हजारो भाविक स्वामी समर्थ चरणी नतमस्तक

### पुण्यतिथी उत्सव; राज्यासह परराज्यातील भाविकांची हजेरी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ६ मे-**
अक्कलकोटनिवासी श्री वटवृक्ष स्वामी समर्थ महाराज मंदिरात १४६ व्या पुण्यतिथीनिमित्त १ लाखापेक्षा अधिक भाविकांनी दर्शन घेतले. अनंतकोटी ब्रह्मांडनायक अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराज की जय या जयघोषात संपूर्ण आसमंत दुमदुमून गेला होता. राज्यासह परराज्यातील स्वामी भक्त दर्शनार्थ आले होते.

पहाटे ४ पासूनच श्रींच्या दर्शनाकरिता स्थानिक व परगावाहून आलेल्या भाविकांची गर्दी होती. सर्व स्वामी भक्तांचे दर्शन सुलभतेने होण्यासाठी वटवृक्ष मंदिर समितीच्या वतीने दक्षिण महाद्वारालगत बॅरेकेटिंगची सोय केली होती. पहाटे २ वा. काकड आरती



झाली. नगरप्रदक्षिणा वटवृक्ष मंदिर ते समाधी मठ ते पुन्हा मुख्य वटवृक्ष मंदिराकडे पहाटे ३ ते ४ या वेळेत निघाली. लघुरुद्र पुरोहित मोहन पुजारी व मंदार महाराज पुजारी यांच्या मंत्रोचारात पार पडले व नामवीणा सप्ताह समाप्ती सोहळा देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते पार पडला. श्री स्वामी समर्थ गुरुलिलामृत चरित्र पोथी पारायण, भजन सोहळा, धर्मसंकीर्तन सोहळ्याची सांगता करण्यात आली. पारायण सेवा देवस्थानच्या विश्वस्ता उज्ज्वलाताई सरदेशमुख, भजनसेवा श्रीशैल गवंडी व धर्मसंकीर्तन सोहळा महेश इंगळे, ओंकार पाठक यांच्या अधिपत्याखाली पार पडले. आ. सचिन कल्याणशेट्टी, माजी आ. सिध्दाराम म्हेत्रे, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्ज्वलाताई सरदेशमुख, संपतराव शिंदे, दयानंद हिरेमठ, ॲड. प्रदीप झपके, विजय दास, गणेश दिवाणजी, माजी नगरसेवक बसलिंगप्पा खेडगी, महेश हिंडोळे, राजकुमार मसुती, यशवंत तात्या धोंगडे, शशिकांत लिंबीतोटे, शिवशरण अचलेर, प्रशांत गुरव, प्रथमेश इंगळे, मंगेश फुटाणे, चंद्रकांत डांगे, नंदू जगदाळे, श्रीशैल गवंडी, संजय पाठक, संतोष देगावकर, स्वामीनाथ लोणारी, शंकरराव पवार, मल्लिनाथ बोधले आदी उपस्थित होते.

### राजघराण्याकडून महानैवेद्य

सकाळी १०.३० वा. नैवेद्य, आरती, दुपारी १२ वा. अक्कलकोट राजघराण्याच्या वतीने श्रीमंत मालोजीराजे भोसले राजासाहेब यांच्या हस्ते व देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांच्या प्रमुख उपस्तिथीत श्रींना महानैवेद्य दाखविण्यात आला. त्यानंतर दुपारी १२ ते ४ या वेळेत देवस्थानच्या पूवकडील उपहारगृह परिसरात व भक्त निवास भोजन कक्ष येथे सर्व स्वामी भक्तांना महाप्रसाद देण्यात आला. हजारो स्वामी भक्तांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला.



## समाधी मठातर्फे पालखी सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ६ मे-**
श्री स्वामी समर्थांच्या बुधवार पेठ, अक्कलकोट येथील समाधी मठात स्वामींची १४६ वी पुण्यातिथी पालखी सोहळा, विविध धार्मिक कार्यक्रमाने पार पडला.

बुधवारी भजन, भारूड, गोपाळकाल्याने पुण्यतिथी उत्सवाची सांगता होणार असल्याचे स्वामी शिष्य चोळप्पा महाराजाचे वंशज अन्नू महाराज पुजारी, नरेंद्र पुजारी यांनी सांगितले. यावेळी विविध कार्यक्रम झाले. सोमवारी पहाटे २.३० पासून काकडारती, धर्मदर्शन, ऋद्राभिषेक, महापूजा, महावस्त्रालंकार, महानैवेद्य, आरती, दुपारी महाप्रसाद, संध्याकाळी ५ वा. स्वामींच्या पालखीची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. यासाठी नारायण पुजारी, नरेंद्र पुजारी, योगेंद्र पुजारी, मोहन पुजारी, मंदार पुजारी, अनिल पुजारी, धनंजय पुजारी, केदार पुजारी, केदार पुजारी, संदेश पुजारी, अनुप पुजारी, यथार्थ पुजारी, सुरेश पुजारी, महेश पुजारी, अण्णू पुजारी, सुधाकर पुजारी, सुनिल पुजारी, विद्याधर पुजारी, निलेश पुजारी, निखिल पुजारी, संकेत पुजारी, आदित्य पुजारी, मोहन पुजारी, चंद्रकांत पाटील, सोमनाथ कुलकर्णी, प्रसाद कुलकर्णी, गवंडी यांनी परिश्रम घेतले.

## स्वामी नामाच्या जयघोषात अन्नछत्राचा रथोत्सव

### स्वामी समर्थ पुण्यतिथी उत्सव; देश-विदेशातील भाविकांची मांदियाळी, महाप्रसादाच्या सेवनाने तृप्तीची ढेकर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ६ मे-**
दिगंबरा दिगंबरा.... श्रीपाद वल्लभ दिगंबरा... श्रीक्षेत्र अक्कलकोटनिवासी श्री स्वामी समर्थ महाराज की जय... च्या जयघोषात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात १४६ व्या श्रींच्या पुण्यतिथीनिमित्त पहाटे रथोत्सव काढण्यात आला. सहा दिवसांपासून रथोत्सव काढण्यात येत होता. यात देश-विदेशातील भाविक सहभागी झाले होते.

न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले, प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी पहाटे रथोत्सव, विधीवत पूजा, धार्मिक कार्यक्रम, पारायण, महाप्रसाद, रक्तदान, जिम्नॅशियमचा १६ वा वर्धापन दिन कार्यक्रम पार पडले.

न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते रथाचे पूजन करुन बुधवार पेठेतील समाधी मठाकडे पालखी मार्गावरून रथ मार्गस्थ झाला. महाप्रसादालयात सकाळी स्वामींचे चरित्र पोती पारायण झाले. महाप्रसादाचे



पूजन आ. सचिन कल्याणशेट्टी, माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे व मनसेचे राज्य उपाध्यक्ष विनायक म्हशीलकर यांच्यासह स्वामी भक्तांच्या हस्ते करण्यात आले. मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या मंत्र पठणाने महाआरती करण्यात आली. दर्शनासाठी महाराष्ट्रासह गोवा, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा, मध्यप्रदेश, केरळ, गुजरात, उत्तराखंड, दिल्ली व जम्मू काश्मीर, राजस्थान, उत्तरप्रदेश, वाराणसी यासह देश व विदेशातील स्वामी भक्तांनी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात येऊन महाप्रसादाचा लाभ घेतला आणि तृप्तीची ढेकर दिली. अन्नछत्र मंडळात महाप्रसादाबरोबरच थंडगार मठ्ठा देण्यात आला. उन्हाचा त्रास होऊ नये याकरिता महाप्रसादालयात एअर कुलर सिस्टीम व समोर ग्रीन नेटची सोय करण्यात आली होती. भाविकांची गर्दी वाढल्याने महाप्रसादाची वेळ सायंकाळी पाचपर्यंत करण्यात आली.

याप्रसंगी मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, शुभंकर कल्याणशेट्टी, अरविंद शिंदे, मनोज निकम, नागेश पिंगळे, अप्पा हंचाटे, माजी नगरसेवक उत्तम गायकवाड, रामचंद्र समाणे, किशोर सिद्धे, शबाब शेख, धनंजय गाढवे, निखिल ढगे, सौरभ मोरे, अशोकराव जाधव, पिंटू साठे, प्रवीण घाडगे, विजय माने, निखिल पाटील, कांत झिपरे, एस. के. स्वामी, बाळासाहेब पोळ, गोरखनाथ माळी, नामा भोसले, शहाजीबापू यादव, सतिश महिंद्रकर, बाळासाहेब घाडगे, मल्लिकार्जुन बिराजदार, दत्ता माने, श्रीनिवास गवंडी, महांतेश स्वामी, धनंजय निंबाळकर, समर्थ घाडगे, देवा हंजगे, शिवकुमार स्वामी, संभाजीराव पवार, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, राजू पवार, गोविंदराव शिंदे, नागेश कलशेट्टी, मल्लिनाथ कोगनुरे, शावरेप्पा माणकोजी, स्वामीनाथ बाबर, लाला निंबाळकर, सिद्धाराम कल्याणी, मैनुद्दीन कोरबू, आनंद चौगुले, दीपक चौगुले, न्यासाचे मुख्य सुरक्षा रक्षक महादेव अनगले, अण्णा गवळी, अप्पा गवळी, महेश मलवे, मलंग मकानदार, शशिकांत कुंभार, पुत्रप्पा सोडगी, सरफराज शेख, काशिनाथ वाले, विश्वनाथ हडलगी, रोहित खोबरे, शिवा मंगरुळे, अभिजित लोकापुरे, पिंटू दोडमनी, विजय विजापुरे, अमोल गरड, प्रकाश माने, अमोल कोळी, राहुल इंडे, शिवू काळे, रोहित मोरे यांच्यासह भाविक उपस्थित होते.

### न्यासाकडून महाप्रसादाचे उत्कृष्ट नियोजन

देव दर्शनासाठी देशातील विविध राज्यात जाण्याचा योग आला. पुण्यतिथीदिना दिवशी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात लाखो स्वामी भक्तांसोबत महाप्रसाद घेण्याचा योग आला. न्यासाकडून करण्यात आलेले नियोजन उत्कृष्ट होते. यामुळे मी भारावून गेलो.

**-विवेक पेडणेकर,**
**स्वामी भक्त, बृहन्मुंबई**